Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- X | ISSUE- VII | JULY | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x

# “ ब्रिटिश वसाहतवाद व भारतीय स्त्री ” विशेष संदर्भ, ब्रिटिशकालीन कायदे

डॉ. प्रमोद चव्हाण
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

औद्योगिक क्रांतीनंतर युरोपियन राष्ट्रांनी आशिया, आफ्रिका, अमेरिका खंडांमध्ये आपले साम्राज्य स्थापित केले. या साम्राज्यवादी स्पर्धेमध्ये सर्वात आघाडीवर असलेला देश म्हणजे, इंग्लंड होय. व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेले इंग्रज, यांनी हळूहळू संपूर्ण भारतावर आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले. ब्रिटिशांनी आपल्या आर्थिक व राजकीय स्वार्थासाठी भारताचे प्रचंड शोषण केले असले तरी सामाजिक सुधारणेच्या बाबतीत ब्रिटिश सत्ता ही भारतीयांसाठी वरदान ठरली असेच म्हणावे लागते. कारण ब्रिटिशांच्या संपर्कामुळे भारतात शिक्षित तरुणांची फळी निर्माण झाली. ज्ञानविज्ञान, स्वातंत्र्य, समता, बंधुता, उदारमतवाद, लोकशाही, मानवतावाद या मुल्यानी भारावलेल्या या तरुणांनी आपल्या समाजातील वाईट रुढी-परंपरा दूर करण्यासाठीं चळवळ सुरू केली.(1) याचे श्रेय आपल्याला ब्रिटिश वसाहतवादालाच द्यावे लागते.

**ब्रिटिश वसाहतवादाचे स्वरूप**

सन 1600 मध्ये स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीने भारताशी व्यापार सुरू केला व या व्यापाराचे रूपांतर भारतात आर्थिक व राजकीय सत्ता प्रस्थापित करण्यामध्ये झाले. वसाहतवाद म्हणजे आर्थिक दृष्ट्या संपन्न व लष्करीदृष्ट्या समर्थ देशाने आपल्या सामर्थ्याच्या बळावर एखादा भूप्रदेश पादाक्रांत करून अथवा व्यापून त्या ठिकाणी वसाहत स्थापून त्या देशावर राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याची प्रक्रिया होय. ब्रिटिशानी भारतात अपला एक राजकीय गट तयार करून त्याद्वारे आपले आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक वर्चस्व इथल्या लोकांवर लादण्याचा प्रयत्न केला. (2) भारतातून अतिशय कमी किमतीत कच्चा माल खरेदी करून त्याच्यावर ब्रिटनमध्ये प्रक्रिया करून पक्का माल बनवायचा. इंग्लंड मध्ये तयार झालेला हा पक्का माल विकण्याची हक्काची बाजारपेठ म्हणून. भारताचा वापर करायचा. आपले व्यापारी हित जोपासण्यासाठी ब्रिटिश राजवटीला एकनिष्ठ राहणारा, त्यांचे ध्येय धोरणे राबविणारा. एक वर्ग ब्रिटिशांनी भारतात निर्माण केला. या सुशिक्षित वर्गास आपल्या सामाजिक उणिवांची जाणीव होऊन त्यांनी त्या दूर करण्यासाठी समाजसुधारणा चळवळ सुरू केली.

**ब्रिटिशकालीन स्त्रीविषयक कायदे**

ब्रिटिशांनी आपली राजवट उदारमतवादी आहे हे दर्शविण्यासाठी स्त्री शिक्षणाला व अस्पृश्यांच्या शिक्षणाला तत्वता मान्यता दिली होती. भारतातील सनातनी विचारांच्या मंडळींनी त्यास विरोध केला. सामाजिक सुधारणा क्षेत्रातील जबाबदारी टाळण्याकडेच ब्रिटिशांचा कल होता. मात्र एकोणिसाव्या शतकात भारतीय समाज सुधारकांना स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटले होते. ख्रिश्चन मिशनर्यांच्या शैक्षणिक कार्याने महात्मा फुले प्रभावित झाले होते. त्यातूनच त्यांनी भारतीय स्त्री शिक्षण सुरू केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता व उदारमतवाद ही लोकशाहीची तत्त्वे भारतीयांच्या मनावर रुजली होती. स्त्रीसुद्धा एक व्यक्ती असून तिलाही तिच्या व्यक्तिमत्व विकासाचे स्वतंत्र असून तिच्यावर बंधने लादणे अन्यायी आहे हे या लोकांना समजले. सतीप्रथा. विधवांचे कठोर जीवन, बालविवाह अशा विविध समस्या भारतीय समाज सुधारकांनी ब्रिटिश सरकारच्या दृष्टीस आणून दिल्या. व त्यांना कायदे करण्यासाठी प्रेरित केले. साहजिकच ब्रिटिश काळामध्ये स्त्री विषयक काही कायदे पास केले. त्यामुळे स्त्रियांना काही प्रमाणात का होईना, कायदेशीर संरक्षण मिळण्यास मदत झाली. ब्रिटिशानी केलेल्या स्त्रीविषयक कायद्यामुळे भारतीय स्त्रियांचा दर्जात परिवर्तन झाले व तिला कायदेशीर अधिकार मिळवू लागले.

**सतीबंदी कायदा** 1829

इ.स. 300 पासुन भारतीय समाजात सती प्रथा अस्तित्वात होती. अनेक स्त्रीया पतीच्या निधनानंतर त्याच्या चितेवर पतीसमवेत जाळल्या जात.(3) कधी स्वेच्छेने तर कधी जबरदस्तीने त्या स्त्रियांना सती जाण्यास भाग पाडले

जाई. भारतीय समाजसुधारणेचे जनक राजा राममोहन राय यांच्या भावाचे निधन झाले. त्यांची विधवा वहिनी पतीच्या चितेवर सती गेली. तो अमानुष प्रकार राजा राममोहन राय आणि प्रत्यक्ष पाहिला परिणामी त्यांच्या मनात या सती प्रथेबद्दल प्रचंड घृणा उत्पन्न झाली आणि त्यांनी सती प्रथेबद्दल चळवळ उभारली. या सती प्रथेला दैवत्वाचा जो मुलामा दिलेला होता, त्याला आव्हान देत त्यांनी तिला धर्मशास्त्रीय आधार नसल्याचे सांगितले. वृत्तपत्रामध्ये अनेक लेख लिहून, पत्रके छापून, त्याबद्दल जनतेचे त्यांनी प्रबोधन केले. त्यामुळे त्यांना प्रचंड सामाजिक विरोधाला तोंड द्यावे लागले. तरीही त्यांनी न डगमगता या अमानुष प्रथेला बंद करण्यासाठी तत्कालीन ब्रिटिश गव्हर्नर. लॉर्ड विल्यम बेंटिंग यांच्याकडे पाठपुरावा करत राहिले. 4 डिसेंबर 1829 रोजी ग. ज. लॉर्ड विल्यम बेंटिंग याने सतीप्रथा प्रतिबंध कायदा पास केला.(4) या कायद्याने विधवा स्त्रीला जिवंत जाळणे, हा कायदेशीर गुन्हा ठरवून त्यास दंड अथवा कारावासाची शिक्षा जाहीर करण्यात आली. नंतर या कायद्यात दुरुस्ती करून विधवा स्त्रीला सती जाण्यास प्रवृत्त करणे हा ही गुन्हा ठरविण्यात आला. सदरील कायदा पास होऊ नये म्हणून सनातनी हिंदू लोकांनी खूप प्रयत्न केले. मात्र त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. सतीबंदीचा कायदा केला असला तरी सन 1907 पर्यंत स्त्रीया सती गेल्याची उदाहरणे आढळून येतात. उदा. रूपकंवर सती प्रकरण

**विधवा पुनर्विवाह कायदा** 1856

हिंदू धर्म परंपरेने विधवा पुनर्विवाह बंदी घातलेली असल्यामुळे समाजात विधवांची संख्या प्रचंड होती. त्यातच सतीबंदी कायदा आल्यामुळे विधवांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. विधवांचा प्रश्न हा प्रचंड जिकिरीचा बनला. विधवांचे विशेषता, बालविधवांचे पुनर्विवाह झाल्याखेरीज हा प्रश्न सुटणार नव्हता. ही बाब ओळखून राजा राममोहन रॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवा पुनर्विवाह बंदीविरुद्ध चळवळ सुरू केली. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी पाराशर स्मृतीचा आधार घेऊन विधवाविवाह धार्मिक मान्यता होती असे दाखवून दिले. ईश्वरचंद्र विद्यासागर यानी 1000 सह्यांचा विनंती अर्ज सरकारकडे पाठविला. त्यांच्या या प्रयत्नांना यश येऊन 1856 साली लॉर्ड डलहौसी यानी विधवा पुनर्विवाह कायदा पास केला.(5) विधवाना होणारी संतती कायदेशीर ठरविण्यात आली. या कार्यात महर्षी धोंडो केशव कर्वे, शशिपाद बॅनर्जी, माधवदास कर्सनदास, विष्णु शास्त्री, इत्यादी सुधारकांनी उक्तीप्रमाणे कृती या न्यायाने विधवाशी पुर्नविवाह करून एक सामाजिक आदर्श ठेवला. एकोणिसाव्या शतकातील या महत्त्वपूर्ण कायद्यामुळे स्त्रीच्या असुरक्षित जीवनात कुठेतरी आशेचा किरण दिसला.

**बालविवाह प्रतिबंध कायदा (शारदा कायदा)**

भारतात प्राचीन काळापासून बालविवाहची प्रथा रूढ होती. साधारणता आठ वर्षाच्या आत मुलीचा विवाह करण्याकडे समाजाचा कल होता. साहजिकच. बालविवाहामुळे. काही मुलांना बालपणीच वैधव्य प्राप्त होत असे. बालविवाहामुळे माता आणि अपत्य मृत्युचे प्रमाणही समाजात फार मोठे होते. या कुप्रथेविरुद्ध केशव चंद्र सेन यांनी चळवळ सुरू केली. त्यांच्या प्रयत्नामुळेच सन 1872 मध्ये कायदा पास करून मुलीचे विवाहयोग्य वय 14 वर्ष आणि मुलांचे विवाहयोग्य वय 18 वर्ष ठरविण्यात आले.(6) बालविवाहच्या या अघोरी प्रथेविरुद्ध बेहरामजी मलबारी यांनी केलेले कार्य देखील महत्त्वपूर्ण ठरते. त्यांच्याच प्रयत्नामुळे 1891 मध्ये संमतीवयाचा कायदा पास झाला. या कायदानुसार 12 वर्षापेक्षा कमी वयात मुलीचा विवाह बेकायदेशीर ठरविला. बाल विवाह विरोधी सर्वात महत्त्वाचा मानला गेलेला कायदा, सन 1929 मध्ये पास करण्यात आला. हरविलास शारदा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कायद्यास, शारदा कायदा म्हणून ओळखले जाते. या कायद्याने मुलीचे विवाहाचे वय 14 वर्ष ठरवण्यात आले तर मुलाचे विवाहाचे वय 18 वर्ष ठरवण्यात आले.(7) उपरोक्त वयापेक्षा कमी वयात मुला मुलीचे विवाह करणे हा कायदेशीर गुन्हा मानला जाऊ लागला. परिणामी हळूहळू बालविवाहची प्रथा कमी होण्यास मदत झाली.

**स्त्री बालहत्या प्रतिबंध कायदा** 1870

ब्रिटिशकालीन भारतीय समाजात. स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन दुषित होता. मुलगी म्हणजे परक्याचे धन आणि मुलगा म्हणजे वंशाचा दिवा यामुळे मुलीच्या जन्माचे कुटुंबामध्ये स्वागत होत नव्हते. अनेक मातापिता. जन्मताच मुलीला मारून टाकत. मातेच्या स्तनांना विष लावून मुलीला स्तनपान करणे, गंगा नदीत सोडणे, दुधात बुडविणे अशा मार्गांनी मुलींची हत्या केली जाई. अशा या क्रूर प्रथेविरुद्ध ब्रिटिश सरकारने 1795 चा बंगालचा कायदा. आणि 1804 चा कायद्यांनुसार स्त्री बालहत्या बेकायदेशीर

ठरविण्यात आली. सन 1870 मध्ये आणखी एक कायदा करून मुलींच्या जन्माची नोंद अनिवार्य करण्यात आली त्यामुळे या प्रथेला काहीप्रमाणात. पायबंद बसला.(8)

**स्पेशल मॅरेज एक्ट** 1872

भारतीय संस्कृतीमध्ये विवाह हि बाब दोन व्यक्तीशी संबंधित नसून दोन परिवाराशी संबंधित मानले जाते. एकोणिसाव्या शतकातही विवाह हे मुला मुलीच्या मनाने नव्हे तर वडीलधाऱ्या मंडळीकडून ठरविले जात. ब्रिटिश राजवटीमध्ये मात्र क्वचित आंतरजातीय विवाह होऊ लागले. अशा विवाहांना संरक्षण देणारा कायदा स्पेशल मॅरेज एक्ट ब्रिटिशांनी 1872 मध्ये संमत केला. या कायद्यान्वये जात, धर्म, वंश असा भेद न करता केले जाणारे विवाह कायदेशीर ठरविण्यात आले. सन 1850 पासून शहरी भागात सुरू झालेले आधुनिक उद्योग, लाभणारे संचारस्वातंत्र्य. आधुनिक शिक्षण, या कारणामुळे अंतरजातीय विवाहाचे प्रमाण वाढू लागले. या कायदाने अशा विवाहांना सम्मती देऊन शासनाच्या पुरोगामी धोरणाची पावतीच दिल्याचे दिसून येते.

**वारसाहक्क कायदा**

पारंपरिक भारतीय समाजामध्ये स्त्रियांना वारसा हक्क नव्हता. तो असावा की नसावा याबाबत विद्वानांमध्ये निरनिराळी मते होती. स्मृति आणि श्रुती साहित्यात पारंपारिक भारतीय समाजामध्ये स्त्रियांना वारसा हक्क नाकारला होता. प्राचीन स्मृति आणि श्रुती साहित्यामध्ये स्त्रियांचा वारसा हक्काबद्दल विद्वानांची मते मांडलेली दिसून येतात. आर्थिक असुरक्षिततेमुळे भारतीय स्त्रियांचे जीवन असुरक्षित बनले होते. त्यावर उपाय म्हणून 1869 मध्ये ब्रिटिश सरकारने एक कायदा पास करून पुरुषाने आपली पत्नी व मुले यांच्या उदरनिर्वाहाच्या गरजा भागविण्यासाठी काहीतरी सोय केली पाहिजे असे सांगण्यात आले. तसेच 1896 मध्ये झालेल्या मद्रास मॅरेज एक्टप्रमाणे घटस्फोटीत पत्नी व तिच्या मुलांना उदरनिर्वाहासाठी पोटगीचा अधिकार देण्यात आला. सन 1929 मध्ये **'हिंदू लॉ ऑफ इन्हेरिटन्स ॲक्ट'** हा कायदा ब्रिटिश सरकारने संमत केला. या कायद्यानुसार कन्या वारसाने स्त्रीला जे काही धन संपत्ती मिळाली असेल त्यावर तीची संपूर्ण मालकी असते असा विचार मान्य करण्यात आला. सन 1937 मध्ये 'हिंदू विमेन्स राइट्स टू प्रॉपर्टी' या नावाचा कायदा पास करून त्यामध्ये स्त्रीयांच्या मिळकतीच्या हक्कामध्ये वाढ केली. संयुक्त कुटुंबातील विधवेलासुद्धा आपल्या पतीच्या संपत्तीत काही भाग स्वतःच्या उदरनिर्वासाठी देण्याची सोय या कायद्याने केली.सन 1956 साली हिंदू उत्तराधिकारी अधिनियम नुसार मुलीला आपल्या पित्याच्या संपत्तीमध्ये मुलांच्या बरोबरीने हक्क दिला गेला.(9) उपरोक्त कायद्यानुसार. स्त्रियांना काही अंशी का होईना आर्थिक सुरक्षितता प्राप्त होऊन स्त्रीचा सामाजिक दर्जा सुधारण्यास मदत झाली.

**घटस्फोट कायदा :**

ज्या धर्मामध्ये विवाह हा एक करार मानला जातो तेथे घटस्फोटाचे प्रमाण जास्त असते. मात्र ज्या धर्मामध्ये विवाह हा एक पवित्र संस्कार मानला जातो तिथे घटस्फोटाचे प्रमाण कमी असते. हिंदू धर्मामध्ये विवाह हा संस्कार मानला गेला आहे. यामध्ये सात जन्म पती-पत्नीने एकत्र राहण्याचा विचार समाजमान्य होता. साहजिकच पतीकडून कितीही अन्याय अत्याचार झाला तरी. घटस्फोटाचे नाव काढायचे नाही, असा संस्कार हिंदू स्त्रियांच्या मनावर खोल रुजलेला होता. मुस्लिम समाजातील स्त्रियांवर घटस्फोटाचे सावट सतत होते. पति केवळ तीन वेळा तलाक हा शब्द उच्चारून आपल्या पत्नीला सहज घटस्फोट देऊ शकत असे. त्यामुळे स्त्रीचे वैवाहिक जीवन अत्यंत असुरक्षित होते. सन 1935 च्या मुस्लिम वैयक्तिक कायद्याअंतर्गत झालेल्या शरीयत अमलबाजवणी कायदा व मुस्लिम विवाह कायदा त्यानुसार स्त्रियांना थोडेसे अधिकार मिळाले. स्त्रियांना पतीला घटस्फोट देण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. मात्र तरीही स्त्री पूर्णतः सुरक्षित झाली असे म्हणता येत नाही.

**द्विभार्या प्रतिबंध कायदा**

पहिली पत्नी हयात असताना दुसर्या स्त्रीसोबत विवाह करण्यास प्रतिबंध घालणारा हा कायदा मुंबई प्रांतामध्ये करण्यात आला. मात्र त्यातून पळवाट म्हणून प्रांताबाहेर जाऊन पुरुषाला विवाह करणे शक्य होते त्यामुळे त्याचा फारसा प्रभाव समाजावर पडू शकला नाही.

**देवदासी प्रतिबंध कायदा**

अंधश्रद्धा ही भारतीय समाजाची प्राचीन काळापासून चालत आलेली समस्या आहे. या अंधश्रद्धेपोटी कितीतरी भारतीय स्त्रीयांना आपला बळी द्यावा लागला आहे. देवदासी प्रथाही अशीच एक अंधश्रद्धापैकी एक आहे. एखाद्या विशिष्ट गोष्टीच्या प्राप्तीसाठी देवाला नवस बोलणे व त्याच्या पूर्तीसाठी देवाला मुलगी वाहने ही प्रथा भारतात बऱ्याच

ठिकाणी दिसून येते. देवाला सोडलेल्या स्त्रीचा विवाह देवाशी लावून दिला जातो. त्यानंतर तिने आयुष्यभर देवाची सेवा करावी, असा दृष्टिकोन असतो. मात्र समाजाच्या स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामुळे अशा स्त्रीयानी वेश्याव्यवसाय करण्याची अनिष्ट प्रथा सुरू केली. त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी सन 1829 मध्ये मद्रास प्रांतात(10) सन 1934 मध्ये मुंबई प्रांतामध्ये ही प्रथा बंद करण्यातसाठीचे कायदे पास करण्यात आले.

**निष्कर्ष**

1. ब्रिटिश कालखंडात उदारमतवादाच्या प्रभावातून स्त्रियांशी संबंधित अनेक कायदे झाले. व या कायद्यांमुळे स्त्रियांच्या समस्यांकडे बघण्याचा एक कायदेशीर दृष्टिकोण समाजामध्ये रुजण्यास सुरूवात झाली. त्यामुळे काही अंशी का होईना परंतु स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारण्यास सुरूवात झाली.
2. भारतीय कुटुंबात स्त्रियांचा दर्जा दुय्यमच राहिला आहे. त्याचे कारण म्हणजे भारतीय समाज हा पुरुष प्रधान संस्कृतीचा आहे. पुरुष हा कुटुंबप्रमुख असल्यामुळे साहजिकच स्त्रियांना कुटुंबात फारसे स्थान नव्हते. एकोणिसाव्या शतकात मात्र ब्रिटिशांचे, कायद्याचे राज्य आले. त्यांनी स्त्रियांना दर्जा सुधारण्यासाठी अनेक कायदे पास केले. उदा. घटस्फोटाचा कायदा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा, वारसा कायदा यामुळे कुटुंबातील स्त्रियांचा दर्जा सुधारण्यास मदत झाली.
3. भारतीय समाजात स्त्रीयावर अन्याय करणारे अनेक अमानुष चालीरिती होत्या. त्यामध्ये बालविवाह, विधवा पुर्नविवाह बंदी, सतीप्रथा या कुप्रथा मुळे तत्कालीन स्त्रीयांचे सामाजिक जीवन दयनीय बनले होते. त्या प्रथा मोडून काढण्यासाठी ब्रिटिशांनी कायदे केले, परिणामी हळूहळू का होईना या कुप्रथा बंद होण्यास सुरूवात झाली. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा सुधारू लागला.
4. उत्तर वेदिक काळापासून भारतीय स्त्रीला आर्थिक अधिकार नाकारले होते. तीच्या आर्थिक दुर्बलतेमुळे तीचे अबलापण अधिकच वाढले होते. ब्रिटिश सरकारने स्त्रियांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी वारसाहक्काचे कायदे केले. त्याद्वारे तिला पतीच्या संपत्तीवर काही प्रमाणात अधिकार दिला. तसेच स्त्रीधन देखील पूर्णता तिच्या मालकीचे असल्याचे मान्य केले. त्यामुळे स्त्रियांना आर्थिक सुरक्षितता मिळाली.
5. शतकानुशतके अज्ञानाच्या अंध कारात. खितपत पडलेल्या भारतीय स्त्रीयांना ज्ञानाचा प्रकाश ब्रिटिश कालखंडातच दिसून आला. वसाहतवादी काळात ब्रिटिश,डच, पोर्तुगीज, स्कॉटीश मिशनर्याने. भारतात मुलींसाठी शाळा सुरू केल्या. त्यामागचा मूळ उद्देश धर्मप्रसार हा असला तरीही, स्त्री शिक्षणास प्रारंभ झाला हे महत्वाचे. अशातच पाश्चात्य ज्ञान विज्ञानाच्या व इंग्रजी शिक्षणाच्या संपर्कामुळे उदयास आलेली भारतातील ससुशिक्षितानी ख्रिश्चन मीशनर्यानी व ब्रिटिश राज्यकर्त्याने भारताचा सांस्कृतिक उणिवावर केलेल्या प्रहाराने अस्वस्थ झाले. यातूनच भारतीय सुधारणा चळवळीचा उदय झाला. व सुधारणा चळवळीने स्त्री शिक्षणाकडे लक्ष पुरविण्यास सुरुवात केली. ख्रिश्चन मिशनर्यांनी सुरू केलेल्या स्त्री शिक्षणामुळे निर्माण झालेला धर्मांतराचा धोका ओळखून स्त्रीशिक्षण देण्याची अपरिहार्यता समाजसुधारकांचा लक्षात आली. म्हणूनच महात्मा ज्योतिबा फुले, महर्षि धोंडो केशव कर्वे, आदिनी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेऊन. स्त्री शिक्षणाचा प्रसार केला.

**संदर्भग्रंथ सूची**

1. रामलखन शुक्ल आधुनिक भारताचा इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, 2001, पृष्ठ 243.
2. कौलेश्वर राय, आधुनिक भारत, किताब महल, नागपुर,1984, पृष्ठ 570.
3. सामंत मंगला, स्त्री पर्व, नेटवर्क प्रकाशन, पुणे, 2008, पृष्ठ-81.
4. कौलेश्वर राय, आधुनिक भारत, किताब महल, नागपुर,1984, पृष्ठ-139
5. कित्ता-173
6. रामलखन शुक्ल आधुनिक भारताचा इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, 2001, पृष्ठ 362.
7. कित्ता- 367
8. कित्ता- 366
9. रामलखन शुक्ल आधुनिक भारताचा इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, 2001, पृष्ठ 367.
10. कौलेश्वर राय, आधुनिक भारत, किताब महल, नागपुर,1984, पृष्ठ-139